IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
Impact Factor: 5.731
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Volume 2, Issue 2, February 2021

# कोविड–19 आणि शैक्षणिक मानसिकता

**डॉ. प्रविण कोहळे**

मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड

pravinkohale67@gmail.com

**प्रस्तावनाः**

जानेवारी 2020 रोजी भारतातील पहिला रूग्ण हा केरळमध्ये आढळला. हा रूग्ण चीनच्या उहानमधून आला होता. भारतात कोरोना व्हायरसचे आगमन आल्याने संपर्ण देश केरळकडे पाहात होता. पण केरळ सरकार जागे झाले आणि पुढचे तीन महिने सतर्क राहून आणि नियोजनबध्द उपाययोजना केल्या. एकवेळ अशी होती की केरळ राज्य कोरोना रूग्णांच्या संख्येच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर होते. पण महिनाभरात कठोर उपाययोजनांमुळे केरळमध्ये रूग्णांची संख्या 400 च्या आत रोखण्यात सरकारला यश आल.

महाराष्ट्रातील कोरोना विषाणूचा उद्रेक 9 मार्च 2020 रोजी सुरू झाला. या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे होणाऱ्या साथीच्या आजाराची पहिली नोंद झाली. 17 मार्च 2020 रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरोना बाधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली. महाराष्ट्र हे देशातील कोरानाचा सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य आहे.राज्यात 3 मे 2020 पर्यंत 12,974 जणांना याची लागण झाली असून त्यापैकी 548 जणांचा मृत्यु झाला आहे आणि 2,115 जण पुर्ण बरे झालेले आहेत. एकुण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी 4ः लोकांचा मृत्यू झाला आहे.

महाराष्ट्र राज्यातील दोन तृतीयांशपेक्षा जास्त रूग्ण मुंबई महानगर भागातून (एमएमआर) आढळून आलेले आहेत. एमएमआर मुंबई, पुणे जिल्ह्याचा पट्टा हा देशातील कोरोना व्हायरस प्रादुर्भावासाठीच्या 10 ‘‘हॉटस्पॉट’’ पैकी एक बनला आहे. 14 एप्रिल पर्यंतच्या आकडेवारीनुसार भारतातील एकुण रूग्णांपैकी एकटया महाराष्ट्रात 23 ः रूग्ण असून एकुण मृत्यूपैकी 46ः लोकांचा मृत्यू झाला आहे.

या उद्रेकावरील उपाययोजनेचा भाग म्हणून काही अभुतपूर्व निर्णय घेण्यात आले. 11 मार्च 2020 पासून राज्यातील प्रवाशी वाहतूक करणाऱ्या सर्व बस सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आल्या. 13 मार्च रोजी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा उद्रेक पाहता महाराष्ट्रात महामारी रोग अधिनियम 1897 लागू करण्यात आला. राज्यात जमावबंदीचे कलम 144 लागू करण्यात आले. 22 मार्चपासून प्रवासी वाहतुक करणाऱ्या सर्व आंततराष्ट्रीय विमान सेवा, रस्ते तसेच मुंबईतील लोकल सेवा बंद करण्यात आल्या. 23 मार्चला जमावबंदीचे फरक पडत नसल्याचे पाहून संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू करण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. राज्याच्या सर्व सीमा सिल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला राज्यातील सर्व जिल्ह्यांच्याही सीमा सिल करून एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात वाहतूक करण्यास त्यानुसार मनाई करण्यात आली. सर्वधर्मीयांची प्रार्थना स्थळे बंद करण्यात आली. देशातील विमानतळे बंद करण्याचा संबंधित अधिकार पंतप्रधानांना असल्याने सर्व विमानतळे त्वरीत बंद करण्याची विनंती उध्दव ठाकरे यांनी पंतप्रधानांना केली.

महाराष्ट्रातील जनजीवनावर याचे फार मोठे परिणाम झाले. राज्यात लागु झालेल्य नियमांनुसार अत्यावश्यक कामाशिवाय सर्वांनी घरी बसणे सक्तीचे करण्यात आले. नागरिकांची उपासमार होऊ नये, अन्न–धान्याचा तुटवटा भासू नये महणून रेशन दुकानावर तीन महिण्याचे रेशन देण्याचा निर्णय झाला. 24 मार्चच्या मध्यरात्रीपासून देशांतर्गत प्रवासी वाहतूक करणारी विमानसेवाही बंद करण्यात आली.

कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लोकांनी घराबाहेर पडू नये, दोन व्यक्तीमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने वारंवार करूनही लोक गंभीरतेने घेतांना दिसले नाहीत. जिवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी जनतेला दिलेली सुट हीच लोकांच्या बेशिस्तीच्या वागण्याने समाजासाठी प्राणघातक ठरू नये यासाठी पोलीस यंत्रणा झगडत आहे वैद्यकिय यंत्रणा जीवावर उदार होऊन रात्रंदिवस सेवा करण्यास गर्क आहे. मुलभूत अधिकारांसोबत नागरिकांनी आपल्या मुलभूत कर्तव्याबाबतही जागरूक असायला हवे असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्न बरणे यांनी व्यक्त केले.

- **कोविड–19 शासन**
- **पंतप्रधानाचे मत :–**

''जनता कर्फ्यु महणजे जनतेसाठी जनतेकडून स्वतःवर लावण्यात आलेला कर्फ्यूं'' असं पंतप्रधान नरेंद मोदी यांनी सांगीतलं. या रविवारी म्हणजेच 22 मार्च रोजी सकाळी 7 वाजेपासून रात्री 9 वाजेपर्यंत सर्व देशवासीयांना जनता कर्फ्यू पालन करायचं आहे. जनता कषयं दरम्यान कोणत्याही नागरिकाने घराबाहेर पडू नये, फक्त जे अत्यावश्यक सेवांशी जोडलेले आहेत त्यांनीच घराबाहेर पडावं, असं मोदींनी आवाहन केले. हा प्रयोग आपलं आत्मसंयम, देशहितासाठी कर्तव्य पार पाडण्याचा एक मजबुत संकल्पच असेल, असे मोदींनी सांगितलं.

**जनता कर्फ्यु –**

भारतात कोरोना व्हायरसच्या उद्रेक दरम्यान स्वतःला लागू केलेला कर्फ्यू जनतेची संचारबंदी हा कोरोना व्हायरसच्या प्रसाराचा सामना करण्यासाठीचा प्रयत्न होता. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 22 मार्च 2020 रोजी सकाळी 7 ते रात्री 9 वाजेपर्यंत स्वयं लादलेले कर्फ्यू पाळण्याची भारतातील सर्व नागरिकांना विनंती केली. भारतातील कोरोना व्हायरस रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत व्हावी हा यामागचा उद्देश होता 24 मार्च 2020 रोजी पंतप्रधानांनी जाहीर केले की, भारतात येत्या 21 दिवस पूर्ण लॉकडाऊन राहील.

- देशभरात येत्या रविवारी 22 मार्चला जनता कर्फ्यु
- रविवारी सकाळी 7 ते 9 वाजेपर्यंत घरातच राहा.
- अत्यावश्यक सेवा देणाऱ्यांनाच रविवारी संध्याकाळी 5 ला अभिनंदन करा.
- घराच्या खिडकीत, बाल्कनीत टाळया वाजवा, घंटी वाजवा.
- डॉक्टरांवर ताण देनदिन चेकअपसाठी गदर्दी करू नका.
- व्यापारी आणि श्रीमंतानी कामगारांचे पगार कापू नका.
- ना जीवनावश्यक वस्तुचा तुटवडा, ना घाबरण्याची गरज.
- ज्येष्ठ नागरिकांनी घराबाहेर पडू नये, गर्दी टाळावी.
- मी कोरोनाषाधित होणार नाही, दुसऱ्यालाही होऊ देणार नाही.

आज अख्या जगावर आक्रमण करणाऱ्या कोरोना या रोगाने अतिक्रमण मोठया प्रमाणात हानी केली आहे आणि या कोरोना लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांवर सुध्दा खूप मोठया प्रमाणात परिणाम झाला आहे. कोविड–19 च्या लॉकडाऊनमुळे शिक्षणावर होणारा परिणाम सध्या देशात तसेच जगभरात कोरोना प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर देशात लॉकडाऊनचा फटका विद्यार्थ्यांनाही मोठ्याा प्रमाणात बसला आहे. कोरोना आणि लॉकडाऊनमुळे देशातील 26.5 कोटी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम झाल्याची माहिती समोर आली आहे.

सक्तीच्या लॉकडाऊनमुळे रिकामेपणा व एकटेपणामुळे कौटुंबिक, सामाजिक, मानसिक, आरोग्याच्या समस्या निर्माण होवू लागल्या आहेत. कोरोनाला रोखण्यासाठी अनेक देशात शिक्षण सुध्दा बंद केल्या आहेत. युनेस्कोच्या अहवालानुसार एप्रिल 2020 मध्ये देशात 154 कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात 15 लाख शिक्षक घरी बसले आहेत, तर उच्च शिक्षणात 15 लाख महाविद्यालयातील शिक्षक घरी बसले आहेत. कोरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे. असे मानल्या जात आहे पण संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे सुधा लक्षात घेणे आवश्यक आहे.

भारतात 15 लाख शाळा बंद आहेत, त्यामुळे 26 कोटी विद्याथी 89 लाख शिक्षक घरी बसले आहेत. शिक्षणासाठी भारतातील विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासमोर लॉकडाऊनमुळे अडचणीचे डोंगर उभे राहीले आहेत. अभ्यासक्रमाचे आधिक ताण नौकरी मिळण्याची अनिश्चितता शिक्षण कर्जाच्या दडपणाखाली आहेत. काही परदेशातील विद्यार्थी संकटात असून त्यांना मदत करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय एकत्रित योजना करणेही गरजेची आहे.

5 एप्रिल रोजी मानव संसाधनमंत्री यांनी असे आष्वासन दिले आहे की, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. कष्टकरी लोकांची मुले डोळयासमोर ठेवून शाळा बंद असलेल्या काळात या मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना केंद्र व राज्य सरकारनी तातडीने करावी.

कोरोना महामारीमुळे जगभर ऑनलाईन शिक्षणावर मोठ्याा प्रमाणात भर देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण इंटरनेट नसल्याने सुमारे 40 कोटी मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे धक्कादायक अहवाल दिसू लागले.

आज जगभरात पसरलेली महामारी कोविड–19 मुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लॉकडाऊन आणि कर्फ्यू मुळे घरातून बाहेर निघून शिक्षण प्राप्त करणे कठीण झाले आहे. अशा काळात देशातील विविध शाळांमधील शिक्षकांनी ऑनलाईन माध्यमाने विद्यार्थ्यांना शिकविणे सुरू केले. स्काईप, व्हॉट्सअॅप, झूम व्हिडीओ इत्यादी काही प्रसिध्द मोबाईल अॅप आहेत, ज्यांच्या मदतीने ऑनलाईन शिक्षण दिले जाते. यात विद्यार्थी आपआपल्या घरी स्टडी टेबलवर बसून लॅपटॉप अथवा मोबाईलच्या सहाय्याने शिक्षण मिळवू लागले.

**भारतामध्ये लॉकडाऊनचे एकूण 4 टप्पे झाले आहेत ते पुढील प्रमाणे**

**1) 25 मार्च 2020 ते 14 एप्रिल 2020 (21 दिवसांचे लॉकडाऊन)**

**समस्या** :– कोविड–19 च्या पहिल्या लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्याा प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले. लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांचे कॉलेज, शाळा बंद झाल्या, त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसला. लॉकडाऊनमुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या परिक्षा झाल्या नाहीत, त्यामुळे त्यांचे खूप जास्त नुकसान झालेले आहेत.

**2) 15 एप्रिल 2020 ते 03 में 2020 (19 दिवसांचे लॉकडाऊन)**

**समस्या** :– ऑनलाईन वर्गासाठी नोंदविलेले बरेच विद्यार्थी नियमित उपस्थित राहत नाहीत असेही सर्वेक्षणात दिसून आले. याचे कारण मोबाईल किंवा इंटरनेटची उपलब्धता हे आहे. 73 टक्के मुले त्यांच्या पालकांचा किंवा घरातील कोणत्याही सदस्यांचे मोबाईल वापरत आहेत.

अर्थात त्यातील बहुसंख्य मुलांनाही मोबाईल हवा तेव्हा तेवढा वेळ वापरण्याची मुभा आहे. मात्र मोबाईल दिवसभर मिळत नाही असे 23 टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले. घरात एखादीच मोवाईल असेल तर त्याचा वापर पालक अन्य भावंडे अशा सर्वांमध्ये विभागला जातो व मोवाईल चार्ज व रिचार्ज करण्यासाठीही वेळ मिळत नाही असे अनेकांनी नमुद केले. इंटरनेट निट नसेल तर ऑनलाईन क्लॉस मध्ये समस्या निर्माण होतात.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
IJARSCT
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 2, February 2021

**3) 4 में 2020 ते 17 में 2020 (14 दिवसाचे लॉकडाऊन)**

**समस्या** :— कोविड–19 च्या महामारीमुळे लावण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे देशभरातील शाळा, महाविद्यालये बंद आले आहेत. ऑनलाईन शिक्षणाच्या घाईने उचलल्या गेलेल्या या अनियोजीत पावलामुळे डिजीटल उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना समस्या निर्माण होतांना दिसून आल्या.

**4) 18 ते 2020 ते 31 में 2020 (14 दिवसांचे लॉकडाऊन)**

**समस्या** :— ऑनलाईन शिक्षण मुलांनाच मिळत आहे, कारण भारतात केवळ 24 टक्के कुटुंबाकडे स्मार्टफोन्स आहेत आणि 11.5 टक्के घरांमध्ये कॉम्प्यूटर व इंटरनेट कनेक्शन आहे, मात्र या सर्वांचा आयुष्यात एप्रिलच्या पहिल्या आठवडयापासून संकुचीत झाले आहेत. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थी यांच्या शैक्षणिकतेवर खूप मोठा परिणाम झालेला आहे.

डिजीटल शिक्षण आणि विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य कोविड–19 मुळे लावण्यात आलेला लॉकडाऊन यामुळे देशभरातील शाळा, महाविद्यालये बंद झालेली आहेत. परिणामतः भारतात शाळा व्यवस्था पारंपारीक वर्णामधून डिजीटल प्लॅटफार्मवर स्थलांतरीत झाली आहे. सध्या ऑनलाईन पध्दतीने शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाचा अनुभव जाणून घेण्यासाठी 15 से 17 मे या कालावधीत त्यांचे सर्वेक्षण घेण्यात आले. 40 प्रश्नांची एक प्रश्नावली काढण्यात आली. व्हॉट्सॲप व ईमेलव्दारे पाठविण्यात आली. 13 राज्यातील 155 विद्याध्यांनी या प्रश्नांची उत्तरे दिली जाईल.

**शिक्षणाचे गांभीर्य** :—

शाळेतील वर्ग हा मनाला ताजेतवाने करणारा स्त्रोत आहे, याचा शिक्षकांना अनेकदा विसर पडतो. केवाह विद्यार्थ्यांना वर्गाशी संबंधीत काही गंमतीशिर उपक्रम दिले जात आहेत. तर 1 टक्के विद्यार्थ्यांना केवळ गैलपिक आदान प्रदानापलीकडे काहीच दिले जात नाही.

अनेक शाळा एकापाठापाठ एक ऑनलाईन वर्ग घेत आहेत. 60 टक्के विद्यार्थी दररोज 40–50 मिनिटांचा ऑनलाईन क्लॉस करतात. याशिवाय अनेक शिक्षक कोणत्याही मार्गाने अभ्यासक्रम पूर्ण करायच्या मागे लागले आहेत. शाळेत दिल्या जाणाऱ्या गृहपाठाहून खूप अधिक काम मुलांना दिले जात आहे. दररोज कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे काम दिले जाते असे 83 टक्के मुलांनी सांगीतले.

**शाळेपलीकडील अध्ययन** —

मुलांसाठी अभ्यासाचे तास येथेच थांबत नाहीत. शिक्षणाच्या या नविन युगात केवळ शालेय अध्ययनावर अवलंबून राहणे कदाचीत घडते. नियमित शाळेसह खाजगी शिकवण्या हे भारतात शिक्षण व्यवस्थेचे वैशिष्टय आहे. बाहेर पडल्यावर निर्बंध आल्यामुळे खाजगी शिकवण्यासाठी व्हिडीओ आणि ऑडीओ व्याख्यानच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण घेतला जात आहेत.

**सुलभ उत्तर नाहीच** :—

डिजीटल शिक्षणासाठी नियम तयार करण्याची प्रक्रिया सरकारने सुरू केली हे प्रोत्साहक आहे. हे नियम सरकारी व अनुदानित शाळांसोबत खाजगी शाळेतही लागू झाले पाहिजेत.

ऑनलाईन शिक्षण आणि त्यामुळे जीवनशैली ज्या पध्दतीने मुलांच्या शारिरीक व मानसिक स्वास्थावर परिणाम करत आहे ते बघता–बघता मुलांच्या आयुष्यावर दिर्घकाळ परिणाम होवू शकतो. आपल्याला पुढील पिढीने अशा पध्दतीने शिक्षण घेणे अपेक्षित

आहे का हा प्रश्न पालकांना व धोरणकर्त्यांनी स्वतःला विचारावा. विद्यार्थ्यांना कोविड–19 मुळे जगाशी जुळवून घेण्यात मदत करण्यासाठी पालक शिक्षण व धोरणकर्त्याचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत.

**शैक्षणिक क्षेत्रावर झालेला परिणाम :–**

लॉकडाऊनमुळे शाळा, कॉलेज बंद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे. सध्या ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. तरीपण काही विद्यार्थ्यांकडे मोबाईल उपलब्ध नाही व मोबाईल उपलब्ध असल्यास नेटवर्क समस्या उद्भवतात, त्यामुळे याचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे.

**विद्यार्थ्याच्यां शैक्षणिक विकासावर झालेला परिणाम :–**

कोरोना व्हायरस साथीच्या रोगाच्या नुकताच झाल्याने जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रातील दरी वाढली. जरी कोरोना व्हायरस साधीचा रोग देशभर किंवा खंडभर असलेला ही कादंबरी आहे. परंतू मानवतेवर त्याचा अधिक घातक परिणाम झाला आहे. कोविड–19 च्या उद्रेकामुळे शैक्षणिक अडथळे निर्माण झाले आहेत आणि जागतिक आरोग्य समस्या आरोग्य यंत्रणाव्दारे व्यवस्थापित करणे खुपच कठीण असल्याचे सिध्द झाले आहे. आतापर्यंत जगातील कोणतेही राष्ट्र किंवा वंश कोरोना व्हायरस साथीच्या आजारापासून मुक्त नाही आणि सर्व जगाच्या प्रसाराची गेली आणि कोविड–19 च्या विध्वंसक प्रभावानी संपूर्ण जग भारावून गेलेले दिसते. कोरांना व्हायरस साधीचा रोग सर्व देशभर व खंडभर असलेला कोणत्याही सिमा नाही आणि वेगवान आहे. रोगाचा प्रादुर्भाव झाल्याच्या काही महिण्यातच त्यांचे कोट्याावधी लोकांना परी राहण्यास भाग पाडत आणला, स्वतःच्या अनुभवाचे निरिक्षण करा आणि कार्य करा आणि घरातून शिक्षण पुर्ण करा.

**कोविड–19 मुळे शाळा बंद होण्याचे परिणाम :–**

कोविड–19 सर्व देशभर असलेला जगभरातील शैक्षणिक प्रणालीवर परिणाम झाला आहे. ज्यामुळे शाळा, विद्यापीठे आणि महाविद्यालये जवळजवळ बंद पडली आहेत. कोविड–19 चा प्रसार कमी करण्याच्या प्रयत्नात जगातील बऱ्याच सरकारांनी शैक्षणिक संस्था तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. 30 सप्टेंबर 2020 पर्वत साथीच्या आजाराच्या प्रतिसादात शाळा बंद झाल्यामुळे अंदाजे 1.077 अब्ज शिकणारे विद्यार्थी प्रभावित झाले आहेत. युनिसेफच्या देखरेखीनुसार जगातील 61.6 टक्के लोकसंख्या सध्या देशव्यापी बंदीची अंमलबजावणी करीत आहे.

1) व्यत्ययात्मक शिक्षण शाळा आवश्यक शिक्षण प्रदान करते आणि जेव्हा ते बंद होते, तेव्हा विद्यार्थी वाढ आणि विकासाच्या संधीपासून वंचित असतात.

2) पोषणः–  बरेच तरूण अन्न आणि निरोगी, पोष्टीक आहार देण्यासाठी शाळांमध्ये किंवा सवलतीच्या जेवणावर अवलंबून असतात. कोरोना व्हायरसमुळे शाळा बंद झाल्यामुळे याचा त्रास झाला आहे.

3) डिजीटल शिक्षण पोर्टलवर अनन्य प्रवेश तंत्रज्ञानात प्रवेश नसणे किंवा शाळा बंद पडत असतांना सतत शिकण्यासाठी चांगले इंटरनेट कनेक्टिविटी.

4) शाळा व शाळा प्रणालीवरील दबाव वाढलेला, स्थानिक शाळा बंद झाल्याने शाळांवर ओझे लादले जाते. कारण पालक त्यांच्या मुलांना शाळा उघडण्याकडे वळवतात.

5) सामाजिक अलगाव शैक्षणिक संस्था सामाजिक क्रियाकलाप आणि मानवी परस्परसंवादाचे केंद्र आहेत हे लक्षात घेता शाळा बंद केल्याने तरूण आणि मुले काही सामाजिक संप्रेषण आणि सामाजिककरणापासून बंचित ठेवू शकतात जे शिक्षण विकास आणि सर्जनशिलता आवश्यक आहेत.

संशोधनाच्या उपक्रमांवर नकारात्मक परिणाम झाला, कारण शाळा बंद झाल्यामुळे आणि लॉकडाऊनमुळे संशोधकांच्या विशेषतः अशा परिस्थितीत विद्यार्थी व शिक्षकांशी समोरासमोर संवाद आवश्यक आहे किंवा शालेय सुविधा किंवा संशोधन प्रयोगशाळांमध्ये प्रवेश नाकारला गेला आहे. अशा परिस्थितीत संशोधन करण्याची क्षमता मर्यादित करते. शाळा असतांना शाळा चालवलेले नवकल्पना आणि संशोधनावरही परिणाम होतो.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

1. प्रदिप आगलावे संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, रुईकर रोड, नागपूर, प्रथमावृत्ती 2006
2. रा. ना. घाटोळे सामाजिक संशोधन पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपुर
3. मेश्राम, प्रा. सुरेश प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, यश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती सप्टेंबर 2000
4. न्यूजपेपर –लोकमत पेपर. 14 एप्रिल 2020
5. इंटरनेट – www.coronainformation.com